मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकणभवन, सहावा माळा,
नवी मुंबई ४००४१६.
दिनांक :- 18 AUG 2006

**कार्यालयीन आदेश क्रमांक १० दिनांक २८/७/२००६**

विषय :- ग्रामपंचायत लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न झाल्यास घ्यावयाच्या आक्षेपाबाबत.

राज्यातील ग्रामपंचायतींच्या प्रलंबित लेखापरीक्षणाचा आढावा घेतला असता मार्च २००६ अखेरीस सुमारे २,४३,६६८/- घटक प्रलंबित असल्याचे दिसुन आले आहे.

लेखापरीक्षण प्रलंबित राहण्यामागे संबधीत संस्थाकडुन विहित मुदतीत अभिलेखे लेखापरीक्षणसाठी उपलब्ध न होणे हे यामागचे महत्वाचे कारण आहे. मात्र याकारणामुळे स्थानिक निधी लेखा विभागाकडे नाहक मोठया प्रमाणात घटक प्रलंबित दिसुन येतात. याविषयीचे प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभागास लिहलेले या कार्यालयाचे पत्र क्रमांक स्था.४/ब/ग्रा.पं./स्था.स्व.स.अ.ले.उपलब्ध न होणे/अे.अे.२/१०६३ दिनांक ६.८.२००५ चे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास, त्यानुसार आक्षेप नोंदवुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमीत करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने त्यांचे पत्र क्रमांक क.लेखाप- २००५/प्र.क्र.२६३०/वित्त-८ दिनांक ८.९.२००५ अन्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना योग्य कार्यवाहीस्तव सुचना दिलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे अभिलेखे उपलब्ध न झाल्यास लेखापरीक्षण अहवालामध्ये घ्यावयाच्या आक्षेपाबाबत एकवाक्यता असणे आवश्यक आहे. त्याकरिता पुढील प्रमाणे सविस्तर सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रथम ग्रामपंचायतींच्या एकुण प्रलंबित घटकांचा आढावा घेण्यात यावा त्यानुसार जिल्हा कार्यालयांनी लेखापरीक्षण दौरा कार्यक्रम निश्चित करावा. लेखापरीक्षण दौरा कार्यक्रम मंजुर करताना तो यापुर्वीच्या प्रलंबित सर्व घटकांसह मंजुर करण्यात यावा. मागील प्रलंबित घटक तसेच प्रलंबित ठेवुन चालु वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात येवु नये.

२) लेखापरीक्षण कार्यक्रम मंजुर करताना ज्या ग्रामपंचायतीचे प्रलंबित घटक जास्त कालावधीपासुन प्रलंबित आहेत त्यांच्या प्राधान्य क्रमानुसार दौरा मंजुर करण्यात यावा.

३) अभिलेखे उपलब्ध न होण्याच्या कारणास्तव लेखापरीक्षण अहवाल निर्गमीत करताना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८, महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ या मधील तरतुदीचे कार्यालयीन आदेशांचे सर्वकष पालन करणे आवश्यक आहे.

४) लेखापरीक्षण सुरु करण्यापुर्वी महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षा नियम १९६१ मधील नियम १२ नुसार किमान ७ दिवसांची लेखी नोटीस देणे त्याची पोच प्राप्त करणे बंधनकारक आहे.

५) उपरोक्त प्रमाणे नोटीस दिल्यानंतरही अभिलेखे उपलब्ध न झाल्यास ग्रामपंचायत लेखापरीक्षा नियम १९६१ मधील नियम १० नुसार ३ दिवसाची रितसर दुसरी नोटीस देण्यात यावी. संस्थेच्या संबधित प्राधीकाऱ्यास विहीत कालावधीमध्ये अभिलेखे सादर करण्याविषयी सुचना देण्यात यावी. या सर्व पत्रव्यवहाराची रितसर पोच अभिलेख्यात ठेवावी. त्यानंतर अभिलेखे न मिळाल्यास सदर बाब संबधित गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

६) अभिलेखे प्राप्त न झाल्यास संबंधित जबाबदार व्यक्तीकडुन लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करण्याच्या कारणाच लेखी कथन प्राप्त करुन घ्यावे. तदनंतर पुढील प्रमाणे लेखापरीक्षण आक्षेप नोंदविण्यात यावा.

७) आक्षेपांचा मसुदा सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे राहील.

परिच्छेद क्रमांक १ :- लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत.

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखा परीक्षा) नियम १२ अन्वये ग्रामपंचायत ........................ पंचायत समिती ........................ जिल्हा ........ ................ चे वर्षे ........................ च्या लेखापरीक्षणास प्रारंभ करण्यापुर्वी लेखी नोटीस पत्र क्रमांक ........................................................................दिनांक ........................अन्वये.................. .....यांना (संबधित व्यक्तीचे पदनाम) देण्यात आली. पुर्वसुचना देवुनही ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत ( लेखापरीक्षा) नियम १९६१ मधील नियम १० अन्वये रीतसर दुसरी नोटीस पत्र क्रमांक ........................ दिनांक ........................अन्वये देण्यात आली. अभिलेखे सादर करण्याविषयी सुचना देण्यात आल्या. तथापी अभिलेखे उपलब्ध न झाल्याने ग्रामपंचायतीचे .......... ........................या वर्षाचे लेखापरीक्षण करता आले नाही. अभिलेखे सादर न करण्याच्या कारणाचे लेखी पत्र ........................यांच्याकडुन प्राप्त करण्यात आले आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे कारण नमुद करण्यात आले आहे. ........................................................................

उपरोक्त कारण पाहता त्यावर पुढील प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. ........................

(अभिलेखे सादर न करण्याबाबतची सर्वसाधारण कारणे व त्याअनुषंगाने लेखापरीक्षकाने शिफारस करावयाची कार्यवाही सोबत जोडली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.)

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा नियम १९६१ मधील नियम १० नुसार लेखापरीक्षण प्रयोजनासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देणे संबधित संस्थेचे कर्मचारी यांची जबाबदारी असताना अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबत आक्षेप नोंदवण्यात येत आहे. सन ........................ते ........................या कालावधीत झालेला सर्व खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

८) उपरोक्त कालावधीचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कालावधीचे लेखापरीक्षण होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे विशेष लेखापरीक्षणाचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवावा. मंजुरी नंतर लेखापरीक्षण करण्यात येईल.

९) उपरोक्त प्रमाणे आक्षेप घेवुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमीत झाल्यानंतर सदर घटक मासिक प्रगती नोंदवहीतील थकित घटकांमधुन कायमस्वरुपी कमी करण्यात यावा.

वरील सुचनांचे तंतोतंत पालन करावे यामुळे ग्रामपंचायतीचे अभिलेख्यांच्याअभावी प्रलंबित असलेले घटक मोठ्या प्रमाणात निकाली निघतील अशी अपेक्षा आहे. ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण प्रगतीवर बारकाईने लक्ष देवून वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. सदर आदेश तात्काळ पासून अमलात आणावेत.

(सी.जी.पवार),
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहीती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ........................

२) उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, विभाग मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपुर.

३) उपमुख्य लेखापरीक्षक , स्थानिक निधी लेखा सर्व , जिल्हा ........................

**अभिलेखे उपलब्ध न करण्याबाबत संस्थेकडुन दिली जाणारी कारणे :-** १) नैसर्गिक आपत्तीमुळे (आगीत जळाल्याने/ पुरात वाहुन गेल्याने/ वाळवी/ इतर) अभिलेखे नष्ट झाल्याकारणाने सादर करण्यात येत नाहीत.

२) अभिलेखे कोर्टामध्ये/ पोलिस/........................कार्यालय यांच्या ताब्यात असल्याने सादर करण्यात येत नाहीत.

३) ज्या कालावधीचे लेखापरीक्षण करावयाचे आहे, त्या कालावधीचे अभिलेखे ज्यांच्या ताब्यात त्यांनी ते अद्याप ग्रामपंचायतीकडे परत केलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करता येत नाहीत.

४) इतर कारणे (अपुर्ण अभिलेखे) इत्यादी.

वरीलप्रमाणे कारणे नमुद केलेली असल्यास लेखापरीक्षकाने आक्षेपांमध्ये पुढील प्रमाणे कार्यवाहीची शिफारस करावी.

१) अनुक्रमांक :- (१)मधील कारणासाठी शासनाकडुन आवश्यक ते निर्लेखन आदेश प्राप्त करण्यात यावेत. शासनाने आदेशामध्ये निर्देशित केल्यानुसार कार्यवाही करावी.

२) अनुक्रमांक :- (२) मधील कारणासाठी अभिलेखे कोर्ट/ पोलिस/ इतर कार्यालय यांच्याकडुन प्राप्त करुन याबाबत कार्यवाही करावी व अभिलेखे प्राप्त करुन घ्यावेत.

३) अनुक्रमांक :- (३) मधील कारणासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १७९ नुसार आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर होणे आवश्यक आहे.

४) अनुक्रमांक :- (४) मधील इतर कारण नमुद असल्यास त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची शिफारस करावी.

सदर कारणे ढोबळ मनाने नमुद केलेली आहेत हे लक्षात घ्यावे.

Bh/C४/a२